**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र. ३/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक - १५ फेब्रुवारी, २०१२.

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)

विषय:- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०१२
स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मतमोजणी करावयाची पध्दत

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५, दिनांक- २१ डिसेंबर, २००९ मध्ये महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमध्ये मतमोजणीची कार्यपध्दती विहित केली आहे. यामध्ये मतमोजणीकरिता शक्य तितकी टेबले लावण्यात यावीत. प्रत्येक प्रभागासाठी / गटासाठी / गणासाठी एकच टेबल असेल व त्या टेबलावर त्या प्रभागातील /मतदार गटातील / गणातील मतदान यंत्रे एकामागून एक येतील असे आदेशित करण्यात आले आहे.

मतमोजणीकरिता एका अथवा शक्य असतील तितक्या प्रभागांसाठी / गटांसाठी / गणासाठी एकापेक्षा जास्त टेबले लावून त्या प्रभागांची / गटांची / गणांची मतमोजणी पूर्ण करावी व त्यानंतर पुढील प्रभाग / गट /गण मतमोजणीकरिता घेण्यास परवानगी मिळावी अशी मागणी महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांच्याकडून होत आहे. त्यानुसार मतमोजणीकरिता टेबले कश्याप्रकारे लावण्यात यावीत व मतमोजणी प्रभाग / गट / गणनिहाय करावी किंवा कसे याबाबत संबंधित जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी आपल्या स्तरावर निर्णय घ्यावा. मात्र असे करताना कोणत्याही वेळी मतमोजणी दालनात तसेच दालनाबाहेर उमेदवार किंवा उमेदवारांचे प्रतिनिधी यांची अवास्तव गर्दी होणार नाही तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी आणि त्याचवेळी मतमोजणी नियमानुसार व जलद गतीने होईल याकरिता नियोजन करावे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( ध. मा. कानेड )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग